सकाळ

# प्रा. विपुल संसारेंचे पुस्तक आठ भाषांमध्ये प्रकाशित

## फार्मसी कॉलेज साडवली; नॅनो टेक्नॉलॉजीत संशोधनाला पूरक

**सकाळ वृत्तसेवा**



प्रा. विपुल संसारे

साडवली, ता. ४ : प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेच्या फार्मसी कॉलेज साडवली येथील फार्मासुटिक्स विभागातील प्रा. विपुल संसारे यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन युरोपमधील लॅम्बर्ट ॲकॅडमिक पब्लिशर यांनी नुकतेच केले. २५० पानांचे हे पुस्तक टेक्स्टबुक ऑफ ग्लायकॉसिलेटेड नॅनोपार्टिकल्स या नावाने आठ भाषांमध्ये प्रकाशित झाले. युरोपियन देशांमध्ये खुले झाले आहे.

या पुस्तकामध्ये सहा वेगवेगळे भाग असून यामध्ये फार्मासुटिक्स विषयातील नॅनो टेक्नॉलॉजी विभागातील संशोधनासाठी लागणारी उपयुक्त अशी माहिती आहे, असा उल्लेख प्रा. संसारे यांनी केला.या पुस्तकामध्ये नॅनो टेक्नॉलॉजीच्या साहाय्याने विकसित झालेल्या नॅनो पार्टिकल्स, मिक्रो पार्टिकल्स, लिपोसोम या नॅनो कॅरिअरच्या निर्मितीची माहिती सविस्तररित्या दिली आहे. तसेच नवीन तंत्रज्ञानाच्या आधारे शर्करांचा उदा. ग्लुकोस, फ्रुक्टोस, गॅलॅक्टोसचा उपयोग करून निर्मित केलेल्या नॅनो करियर्सचा विविध आजारांवरील उपचार या विषयी उपयुक्त अशी माहिती देण्यात आली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. सी. हातपक्की आणि संस्थेचे चेअरमन रवींद्र माने यांनी या कामगिरीचे कौतुक केले आहे. या आधी गोवा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिसंवादात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवत प्रा. संसारे यांनी सर्वांच्या कौतुकास पात्र अशी कामगिरी केली होती. प्रा. संसारे यांनी बॉम्बे कॉलेज ऑफ फार्मसी, मुंबई येथून फार्मासुटिक्स विषयातील पदव्युत्तर शिक्षण घेतले असून सध्या ते जयपूर नॅशनल युनिव्हर्सिटी, राजस्थान येथून पीएच.डी. करत आहेत. तसेच त्यांचे आठ शोधनिबंध विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले असून सध्या आणखी दोन पुस्तकांचे प्रकाशन प्रगतीपथावर आहे.मागील दोन वर्षांपासून साडवली येथे रुजू होऊन इतर शिक्षकांच्या मार्गदर्शनाने संशोधन विभागाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत विविध ठिकाणी महाविद्यालयाचा ठसा उमटवत असल्याचे समाधान प्राचार्य हातपक्की यांनी व्यक्त केले.

**06/02/2020**